उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

ARTHA, Poona 4

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PR. PAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख ४ एप्रिल, १९६२ | अंक ७

## विविध माहिती

**खताच्या आयातीसाठी तरतूद**—१९६१–६२ सालांत सल्फेट ऑफ अमोनिया हें खत आयात करण्यासाठीं ४० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या प्रकारचें जेवढें खत दरसाल लागतें तें सर्वच्या सर्व देशांत तयार होऊं शकत नाहीं. कोलंबो योजनेप्रमाणें अगर तांत्रिक सहकार्य मंडळाच्या मार्फत खताची आयात करण्याचा सरकारचा विचार नाहीं.

**नागपूर–उमरेड रेल्वे रस्ता**—नागपूर ते उमरेड ह्यांच्या दरम्यान रुंद रुळाचा रेल्वे रस्ता बांधण्याच्या कामाची प्राथमिक पहाणी करण्यांत येणार आहे. रेल्वेखात्यातर्फे १९६२–६३ सालीं हें काम हातीं घेण्यांत येईल. विदर्भामधील लोकांतर्फे ही मागणी बरींच वर्षें करण्यांत येत आहे. नवा रेल्वे रस्ता झाल्यावर नागपूर विभागाच्या औद्योगिक विकासास जोराची चालना मिळेल.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या गोव्यांतील शाखा**—भारतांत नव्यानें सामील झालेल्या गोवा प्रदेशांत आयुर्विमा कॉर्पोरेशननें तीन शाखा उघडल्या आहेत. कॉर्पोरेशनची गोव्यामधील मुख्य कचेरी पंजीम येथें राहील. आयुर्विम्याचें राष्ट्रीयीकरण झाल्यापासून गोव्यांत विम्याचा धंदा चालूच होता. परंतु १९५६ सालापासून पोर्तुगीज सरकार जुन्या पॉलिसी चालू ठेवण्यापुरतेंच सहकार्य देत असे.

**रिहंड येथील वीजकेंद्र**—उत्तर प्रदेशांत रिहंड येथें बांधण्यांत येत असलेलें विद्युत्-केंद्र ५ एप्रिल ह्या दिवशीं पंतप्रधान नेहरू चालू करणार आहेत. ह्या केंद्राच्या उभारणीसाठी ४६ कोटी रुपये खर्च आला असून, त्यांत प्रत्येकी ५० हजार किलोवॅट वीज उत्पन्न करणारी तीन टर्बाइन्स बसविण्यांत आलीं आहेत. त्यांपैकी एक वीजनिर्मितीचें कार्य करूंहि लागलें आहे.

**जपानच्या साह्यानें खताचा कारखाना**—भारतांत एखाद्या खासगी मालकीच्या कंपनीशीं सहकार्य करून खताचा कारखाना काढतां येईल काय, ह्याची चौकशी कांहीं जपानी कारखानदार करीत आहेत. ह्या कामीं त्यांना बिर्ला गटाचें सहकार्य मिळण्याची बरीच शक्यता आहे. सहकार्य शक्य झाल्यास संकल्पित कारखाना काढण्यासाठी जपानकडून तांत्रिक व आर्थिक साह्य मिळेल.

**ब्रम्हदेशांत भांडवलाला वाव**—ब्रम्हदेशांत अमेरिकेच्या भांडवलाला भरपूर वाव आहे, असें मत अमेरिकेंतील एका व्यापारी संघटनेच्या पुढाऱ्यानें व्यक्त केलें आहे. संघटनेच्या प्रतिनिधींनी ब्रम्हदेशाचा ६ आठवड्यांचा दौरा केला आहे. ब्रम्हदेशांतील ५५ कंपन्यांनीं अमेरिकेला माल निर्यात करण्याची व १२६ कंपन्यांनीं अमेरिकेकडून माल आयात करण्याची तयारी दाखविली आहे.

**सार्वजनिक मालकीची सुताची गिरणी**—त्रिवेंद्रमपासून १० मैलांवर असलेल्या बलरापुरम् ह्या ठिकाणीं सार्वजनिक मालकीच्या विभागांत एक सुताची गिरणी काढण्यांत आली आहे. ह्या गिरणींत सुताच्या १२,००० चात्या आहेत, व त्यांत ३०० कामगारांना रोजगार मिळाला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत त्यामधील चात्यांची संख्या आणखी १२,००० चात्यांनीं वाढविण्यांत येणार आहे.

**ताजमहाल पाडण्यांत येणार होता**—भारतांत आलेले सरकारी पाहुणे ताजमहाल पाहाण्यास चुकत नाहींत. हा ताजमहाल पाडण्याचा निर्णय मरक्विस ऑफ हेस्टिंग्ज ह्या गव्हर्नर-जनरलनें घेतला होता. ताजमहाल पाडून त्याच्या संगमरवरी दगडाची लिलावानें विक्री करण्याचा त्याचा मानस होता. परंतु दगडांची किंमत फारशी येणार नाहीं असें त्याला सांगण्यांत आल्यावर त्यानें आपला बेत सोडून दिला व ताजमहाल बचावला.

**पाठ्यपुस्तकांचा लिलांव**—केरळच्या सरकारनें शाळांसाठीं छापलेल्या पाठ्यपुस्तकांची नुकतीच लिलावानें विक्री केली. ह्या पुस्तकांची छापील किंमत सुमारें ९ लाख रुपये होती, परंतु ती सरकारला ५१ हजार रुपयांना विकावी लागली व शिवाय त्यावर विक्रीकर भरावा लागला. पुस्तकांची गरज लक्षांत न घेता सालोसाल पुस्तकें छापण्यांत आल्यामुळें हा प्रसंग ओढवला.

**रशिआचें नवें अण्वस्त्र**—रशिआनें शोधून काढलेल्या नव्या अण्वस्त्राबद्दल अधिक माहिती प्रसिद्ध झाली आहे. ह्या अस्त्रामुळें अमेरिकेची संरक्षणव्यवस्था दक्षिण, पूर्व व पश्चिम ह्या दिशांना सर्वस्वीं दुबळी झाली असल्याचें सांगण्यांत येत आहे. नवीन अण्वस्त्रें अगदीं अचूक नेमबाजीनें फेकता येतील आणि मोठाल्या वजनाचे बॉम्बहि वाहून नेऊं शकतील.

**सिक्किममधील खाणी**—सिक्किममधील खनिज संपत्तीचा विकास करण्यासाठी सिक्किम माइनिंग कॉर्पोरेशन ह्या संघटनेची स्थापना करण्यांत आली आहे. ह्या संघटनेंत भारत सरकारनेंहि भाग घेतलेला आहे. सिक्किममधील तांबें, शिसें, इत्यादि धातूंच्या खाणी कॉर्पोरेशन चालविणार आहे. खाणीमधून दररोज १०० टन कच्चें खनिज बाहेर काढण्यांत येईल.

**रशिआ तंबाखू घेणार**—चालू वर्षी रशिआ भारताकडून निरनिराळ्या प्रकारची २·५ कोटी पौंड तंबाखू विकत घेणार आहे. आगामी वर्षांत रशिआची तंबाखूची खरेदी वाढतच जाण्याची शक्यता आहे. इंडिअन टोबॅको असोसिएशनतर्फे वरील माहिती जाहीर करण्यांत आली आहे.

**उत्तर सरहद्दीचें रक्षण**—भारताच्या उत्तर सरहद्दीचें रक्षण करण्याच्या योजनेंतील भाग म्हणून ह्या सरहद्दीवर राडारचें जाळें पसरण्यांत येणार आहे. राडारची यंत्रसामग्री जपानकडून घेण्यांत येणार आहे. ह्या सामग्रीची किंमत सुमारें १० कोटी डॉलर्स असेल. भारताच्या संरक्षणखात्याचें एक प्रतिनिधि मंडळ ह्या विषयीं वाटाघाटी करण्यासाठीं लवकरच टोकिओला जाणार आहे. कांहीं यंत्रसामग्री अमेरिका अगर पश्चिम जर्मनी ह्यांचेकडूनहि घेतली जाण्याचा संभव आहे.


**पश्चिम बंगालमध्यें ट्यूब विहिरी**—पश्चिम बंगाल सरकारनें राज्यांतील तीन जिल्ह्यांत २०० ट्यूब विहिरी खोदण्याचें ठरविलें असून, ह्या कामाबद्दल युगोस्लाव्हिआंतील एका औद्योगिक संघटनेशीं करार केला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत पश्चिम बंगालमध्यें २,००० विहिरी खोदण्यांत येणार असून, त्या कामीं सुमारें २५ कोटी रुपये खर्ची पडणार आहेत.

**तेलरंगासंबंधीं संशोधनसंस्था**— तेलरंगासंबंधीं संशोधन करण्यासाठीं भारत सरकारच्या साह्यानें दोन संशोधन संस्था स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक कलकत्ता येथें व दुसरी मुंबई येथें स्थापन करण्यांत येणार आहे. तेलरंग तयार करण्यासाठीं जो कच्चा माल लागतो त्यासंबंधीचें संशोधन मुख्यत: करण्यांत येईल. रंगाच्या धंद्यासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालापैकीं २० टक्के सध्या आयात करावा लागतो.

**ब्रिटनमध्यें धूम्रपानविरोधी मोहीम**—ब्रिटनमधील लंडन, ग्लासगो, मँचेस्टर आणि ब्रिस्टल ह्या चार शहरांतून धूम्रपानविरोधी मोहीम सुरू होण्याचा संभव आहे. सार्वजनिक ठिकाणीं म्हणजे सिनेमागृहें, नाट्यगृहें, बसेस, इत्यादींमध्यें धूम्रपानाला बंदी करण्याच्या कायदेशीर बाजूचा विचार चालू आहे. ब्रिटनमधील डॉक्टरांच्या संघटनेनें धूम्रपान व कॅन्सर ह्यांचा संबंध जोडलेला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग व्याजाचा दर २॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत " ३॥ "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें " ५ "
मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

किर्लोस्कर स्थापना १८८८
इलेक्ट्रिक पंपिंग सेट्स

भारतीय शेतकरी -आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी ( द. सातारा )

# अर्थ

बुधवार, ता. ४ एप्रिल, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कुटुंबनियोजनाच्या प्रगतीमधील अडथळे

### साधनांच्या सुलभ उपलब्धतेचा प्रश्न

१९५१ ते १९६१ ह्या दहा वर्षांत भारताची लोकसंख्या ३५.७ कोटीपासून ४३.८ कोटीपर्यंत वाढली. लोकसंख्येच्या ह्या द्रुतगतीच्या वाढीनें सर्वच विचारवंतांना चिंता वाटूं लागलेली आहे. असें जर आहे तर संततिनियमनाचा अवलंब अधिक जारीनें कां केला जात नाहीं ? ह्याचें साधें सरळ उत्तर असें आहे कीं, लोकांना संततिनियमनाचीं साधनें मिळत नसावींत; अगर त्यांना तीं परवडत नसावींत. ज्या लोकांना संततिनियमन करण्याची इच्छा असेल त्यांना जरूर तीं साधनें सहज व स्वस्त मिळालीं पाहिजेत. भारतांत सुमारें ६ लाख शहरें व खेडीं आहेत. ह्या सर्व ठिकाणीं संततिनियमनाचीं साधनें सुलभतेनें मिळालीं पाहिजेत थोडक्यांत म्हणजे, कोणालाहि तीं आपल्या दाराशीं आहेत असें वाटलें पाहिजे. पण प्रत्यक्ष परिस्थिति ह्याच्या उलट आहे. सरकारतर्फे चालविलीं जाणारीं कुटुंबनियोजनाचीं केंद्रें अत्यल्प आहेत आणि केमिस्टांच्या दुकानांची संख्याहि थोडी आहे. ग्राहकांच्या दृष्टीनें विचार करतां संततिनियमनाच्या साधनांचें उत्पादन, वितरण आणि वापर हीं सर्व फार मोठ्या प्रमाणावर झालीं पाहिजेत. ह्या बाबतींत सिगारेटच्या खपाचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. सिगारेटच्या प्रसारासाठी कांहीं खास प्रयत्न करण्यांत आलेले नाहींत. तरीसुद्धा सिगारेटसचा खप मोठ्या प्रमाणावर कसा होत आहे ? निरनिराळ्या प्रकारच्या सिगारेटस तयार करतांना सारखा दर्जा, आकर्षक पाकिटें, वितरणव्यवस्था, जाहिराती, इत्यादींचा उपयोग केला जातो. चहा आणि साबण ह्या वस्तूंचा खप वाढविण्याच्या कामींहि ह्याच तंत्राचा अवलंब झालेला आहे. तेव्हां सिगारेटच्या कंपन्यांचें अगर साबण, चहा विकणाऱ्या कंपन्यांचें साह्य ह्या बाबतींत घेण्यासारखें आहे.

सरकारला आधींच तयार असलेल्या अशा व्यापारी संघटनांचा फायदा घ्यावयाचा नसेल, तर खात्रीच्या व स्वस्त संततिनियमनाच्या साधनांचें उत्पादन व वितरण करण्यासाठी नव्यानें संघटना उभारावी लागेल. साधनें उत्पादन करणारा कारखाना उभारावा लागेल; तो आपली सर्व उत्पादनक्षमता कारणीं लागेल अशीहि व्यवस्था करावी लागेल. त्याशिवाय उत्पादित साधनांचा सांठा करून त्यांच्या वाटपासाठी जागोजाग केंद्रें स्थापन करावीं लागतील. त्याशिवाय पर्यवेक्षक व विक्रेते ह्यांना शिक्षण द्यावें लागेल आणि जाहिरातींसारख्या साधनांचा उपयोग करावा लागेल इतका मोठा कार्यक्रम अमलांत आणण्यास तीन वर्षें तरी लागतील आणि तो कार्यक्षमतेनें अमलांत आणला गेल्यास चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत संततिनियमनाचीं साधनें सुलभतेनें मिळूं लागतील. हीं साधनें कशीं असावींत असा प्रश्न उत्पन्न होतो. जी व्यक्ति हीं साधनें वापरूं इच्छितें तिच्या गरजांचा विचार केला तर वरील प्रश्नाचें उत्तर सहज मिळण्यासारखें आहे. प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, साधनें वापरणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या कार्यक्षमतेविषयीं संपूर्ण विश्वास वाटला पाहिजे. देशांत कोठेंहि घेतलीं तरी हीं साधनें सारख्याच पद्धतीनें तयार करण्यांत आलेलीं असलीं पाहिजेत. त्यांचीं वेष्टनें सारखीं पाहिजेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमासाठी २७ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या रकमेपैकी एकसप्तमांश ते एक तृतीआंश रक्कम योग्य त्या प्रकारचीं साधनें निर्माण करण्यासाठी व त्यांचें वितरण करण्यासाठी वापरण्यांत आली तर तें इष्ट ठरेल.

---

## इंडिअन ऑइल कंपनीचा बाजारपेठेंत प्रवेश

भारत सरकारच्या मालकीच्या इंडिअन ऑईल कंपनीनें तेल व तज्जन्य पदार्थ ह्यांच्या बाजारपेठेंत प्रवेश केल्यामुळें ह्या मालाच्या घाऊक किंमतीवर परिणाम घडून येणें अपरिहार्य होतें व आहे. ही कंपनी बाजारांत उतरण्यापूर्वी तेल व तज्जन्य पदार्थ ह्यांच्या किंमती परदेशीय मालकीच्या कंपन्यांच्या हातीं होत्या. अजूनहि ह्या कंपनीला खाजगी मालकीच्या परदेशीय कंपन्यांशीं चढाओढ करावा लागते आणि त्यामुळें तिला बरेंच नुकसानहि सोसावें लागतें. तरीसुद्धा कंपनीतर्फे ज्या सरकारी अगर निमसरकारी संस्थांना तेल व तज्जन्य पदार्थ पुरविण्यांत येतात त्या संस्थांना चांगला फायदा झाल्याचें कंपनीच्या दुसऱ्या म्हणजे १९६१ च्या वार्षिक अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. हा अहवाल लोकसभेला कांहीं दिवसांपूर्वी सादर करण्यांत आला आहे. अहवालाच्या वर्षी कंपनीला २.६० लाख रुपये नुकसान सोसावें लागलें आहे. कंपनीच्या पहिल्या वर्षीं डिझेल ऑईल विकण्याच्या व्यवहारांत कंपनीला परदेशीय मालकीच्या कंपन्यांशीं चढाओढ करावी लागली. त्यामुळें दुसऱ्या वर्षीं नुकसान सोसावें लागलें. सुमारें ४४,७०० टन तेलाचा सांठा करण्याची व्यवस्था कंपनीनें केलेली आहे. मुंबई, कांडला, कोचीन, कलकत्ता व सिलगुरी ह्या ठिकाणीं तेलाच्या सांठवणीची आणखी व्यवस्था करण्याचें काम कंपनीनें चालू केलें आहे. तेलाच्या सांठ्याची व्यवस्था करण्याच्या पहिल्या टप्प्यांत ४.२ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार असून, तो पूर्ण झाल्यावर १,३५,००० टन तेल मुख्य मुख्य बंदरांतून सांठवितां येईल. त्याशिवाय पूर्व व उत्तर हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं सांठ्याचीं केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यामुळें आणखी १,००,००० टन तेल सांठविण्याची सोय होईल. कांहीं केंद्रांचें काम पूर्णहि करण्यांत आलें आहे.

---

## " क्रेडिट ट्रॅन्स्फर "–बिलें देण्याची नवी सोय

ग्रेट ब्रिटनमधील कांहीं कंपन्यांनीं आतां आपल्या बिलांबरोबर ' बँक क्रेडिट ट्रॅन्स्फर ' चा एक कागद पाठविण्यास प्रारंभ केला आहे. तूर्त जरी निम-सरकारी आणि बड्या कंपन्यांनीं पुढाकार घेतला असला, तरी हळूहळू बँक क्रेडिट ट्रॅन्स्फरचा प्रसार झाल्याविना राहाणार नाहीं. ' ट्रेडर्स क्रेडिट ' ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पद्धतींत गिऱ्हाईक बरीचशीं बिलें एकच चेक लिहून भागवूं शकतो. तो बँकेला आपल्या घेणेकऱ्यांची यादी, त्यांचें खातें असलेल्या बँकांच्या नांवें आणि प्रत्येकाला द्यावयाची रक्कम ह्याची यादी पुरवितो. एकूण रकमेचा चेक लिहून सोबत पाठवतो. त्याची बँक इतर बँकांना तेवढ्या रकमांचे ' क्रेडिट अड्व्हाइस ' पाठवते आणि चेक क्लिअरिंगद्वारां प्रत्यक्ष देवघेव होते.

गिऱ्हाइकांनीं बँकेला दिलेल्या कायमच्या सूचना अंमलांत आणण्यासाठी बँका अशीच पद्धत अंमलांत आणीत; एका शाखेंत पैसे भरून दुसऱ्या शाखेंत ते जमा करायला सांगायचे. प्रत्येक क्रेडिट अॅड्व्हाइस स्वतंत्र रीत्या नोंदून त्याची विल्हेवाट लावण्याची पुढची पायरी म्हणजे चेक क्लिअरिंगच्या धर्तीवर क्रेडिट क्लिअरिंग. उदाहरणार्थ, मँचेस्टरच्या एका बँक शाखेनें आपली १० किंवा २० किंवा १०० क्रेडिटस स्वतंत्रपणें इतर बँकांकडे किंवा शाखांकडे न पाठवतां, तीं सर्व स्वतःच्या मुख्य कचेरीकडे पाठवायचीं. तेथें जरूरीप्रमाणें ती इतर बँकांशीं रुजू करून, मूळ बँकांकडे परत जावयाचीं. ह्या योजनेंत पैसे मिळायला किमान २४ तास जास्त वेळ लागायचा.

आतां शेवटची पायरी म्हणजे क्रेडिट ट्रॅन्स्फर. ट्रेडर्स क्रेडिट्स, कस्टमर्स क्रेडिट्स आणि स्टँडिंग ऑर्डर पेमेंटस् ह्या तिन्हींचाहि त्यांत समावेश होतो. मुख्य गोष्ट म्हणजे, क्रेडिट ट्रॅन्स्फरची सोय सर्व जनतेला उपलब्ध आहे; खातेदारांपुरती ती मर्यादित नाहीं.

देणेकऱ्याला आपल्या घेणेकऱ्याचें खातें कोणत्या बँकेंत आहे, हें माहीत हवें. ( ह्या पद्धतीनें पैसे स्वीकारण्यास त्याची संमति पण पाहिजे. ) देणेकरी क्रेडिट टॅन्स्फर फॉर्म भरून तो कोणत्याहि बँकेच्या स्वाधीन करतो. बरोबर पैसेहि देतो. तो बँकेचा खातेदार नसेल, तर त्याला प्रत्येक क्रेडिटसाठी ६ पेन्स चार्ज पडतो; खातेदार असल्यास त्याला तावडतोब कांहींच चार्ज पडत नाहीं; त्याच्या चार्जेसचा दर सहा महिन्यांनीं विचार केला जातो, तेव्हां त्याच्या क्रेडिटसचा हिशेब केला जातो.

देणेकरी हा बँकेचा खातेदार असल्यास, तो प्रत्येक देण्याचा स्वतंत्र क्रेडिट ट्रॅन्स्फर फॉर्म लिहितो आणि ते सर्व एकत्रच बँकेच्या स्वाधीन करून एकूण देणें, रकमेचा चेक देतो. ह्यामुळें पोस्टेज, स्टेशनरी आणि त्रास ह्यांची खूपच बचत होते; ग्रेट ब्रिटनमध्यें चेक्सवर स्टँप ड्यूटी आहे; एकाच चेकनें भागत असल्यामुळें स्टँपड्यूटीचीहि बचत होते.

देणेकऱ्याच्या बाजूनें हा विचार झाला. घेणेकऱ्यालाहि त्याच्यापासून पुष्कळ फायदा आहे. आपल्या बिलाबरोबर तो क्रेडिट ट्रॅन्स्फर फॉर्म पाठवितो, त्यामध्यें फर्मच्या हिशेब लिहिण्याच्या सोयीच्या दृष्टीनें जरूर तो तपशील लिहूनच धाडतां येतो. घेणेकऱ्याकडे असे बरेच व्यवहार होत असले, तर तो आपल्या बँकेच्या मुख्य कचेरींत ' कलेक्शन अकाउंट ' ठेवूं शकतो; तेथूनच ता फॉर्म मिळण्याची व्यवस्था करतो. चेक भरणें, तो वसूल झाला आहे किंवा नाहीं हें पाहाणें, नापास झालेल्या चेक्बद्दल पत्रव्यवहार करणें, हा सर्व खटाटोप वाचतो. अनपेड चेकप्रमाणें अनपेड क्रेडिड ट्रॅन्स्फर असूंच शकत नाहीं.

क्रेडिट ट्रॅन्स्फर पद्धत ग्रेटब्रिटनमध्यें रुजायला प्रथम वेळ लागला; गॅस, वीज, पाणी, इत्यादींचीं बिलें व घरपट्टीचीं बिलें आतां क्रेडिट ट्रॅन्स्फर फॉर्म जोडूनच पाठविण्यांत येऊं लागलीं आहेत. बिलाच्या खालच्या भागांत क्रेडिट ट्रॅन्स्फरचा मजकूर असतो तो फाडून घेतां येतो. ह्या योजनेची जाहिरात आतां सुरू करण्याइतपत बँकांना आत्मविश्वास आला आहे. अधिकाधिक लोक ह्या योजनेमुळें बँकांकडे आकृष्ट होतील, बँकिंगची संवय फैलावण्यास मदत होईल, बँकेच्याद्वारां कारखान्यांनीं वेतन देण्यास आणखी चालना मिळेल. क्रेडिट ट्रॅन्स्फरमुळें चेकची पद्धत कमी न होतां तिलाहि चालना मिळेल.

---

## निग्रो बाजारपेठेचें अमेरिकेंत वाढतें महत्त्व

निग्रो लोकांच्या खरेदीच्या संवयी श्वेतवर्णीयांपेक्षा वेगळ्या आहेत. पुष्कळ होटेलांतून त्यांना प्रवेश नसल्यामुळें त्यांचें घरांतच खाणें-पिणें श्वेतवर्णीयांपेक्षा अधिक होतें. त्यांचेजवळ महाग घरें विकत घेण्याची किंवा भाड्यानें घेण्याची ऐपत असली तरी वंशभेदामुळें त्यांना तीं मिळूं शकत नाहींत. प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्यासाठी, त्यांचा मोटारींवर, कपड्यांवर, बुटांवर, उत्पन्नाचे मानानें खर्च भरमसाट होतो. फोर्ड फौंडेशननें निग्रो लोकांच्यासाठी दिलेल्या देणग्यांमुळें, ते फोर्ड मोटारगाड्या खरेदी करण्यास उद्युक्त होतात. निग्रो लोकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीच्या परिणामांची कारखानदारांना दखल घेणें भाग झालें आहे. पंधरा वर्षांचे अवधींत, निग्रोंसाठी वेगळीं रेडिओ स्टेशन्स अनावश्यक ठरतील, अशीं लक्षणें दिसत आहेत.

अमेरिकन कारखानदारांना निग्रोंचे खरेदीदार ह्या दृष्टीनें वाढतें महत्त्व जाणवूं लागलें आहे. गेल्या बारा वर्षांत निग्रोंचें उत्पन्न दुपटीनें वाढलें आहे. अमेरिकनांच्या एकूण उत्पन्नाच्या तें ७% म्हणजे सर्व कनेडिअनांच्या एकूण उत्पन्नाइतकें आहे. अमेरिकन लोकसंख्येपैकी २ कोटी म्हणजे ११% लोकसंख्या निग्रो लोकांची आहे, आणि ती इतरांपेक्षा ५७% जास्त जलद वाढत आहे. निग्रो मासिकांतून जाहिराती देतांना अमेरिकन कारखानदार आतां अद्ययावत् निग्रो तरुणींचीं चित्रें देतात; तीच जाहिरात श्वेतवर्णीयांच्या वाचनांत असलेल्या मासिकांत छापतांना गौरगाय तरुणी दाखविली जाते! उदाहरणार्थ " एबनी " ह्या निग्रो मासिकांतील 'कॅमल' सिगारेट ओढणारी तरुणी निग्रो असते, तर "लुक" मधील तरुणी श्वेतवर्णीय असते! "एबनी" मासिकांत अमेरिकेंतील प्रमुख कारखानदारांपैकी ५७% कारखानदारांना जाहिरात देणें आवश्यक वाटूं लागलें आहे.

---

### रक्त पुरविणाऱ्या कंपनीचा खोटेपणा

आजाऱ्यांची प्रकृति लवकर सुधारावी, म्हणून त्यांना रक्त देण्यांत येतें. असें रक्त पुरविणाऱ्या अमेरिकेंत कांहीं कंपन्याच आहेत; त्यांचा धंदा रक्तदान करणाऱ्यांकडून रक्त पैसे देऊन घेणें आणि तें रक्त इस्पितळांना विकणें. २१ दिवसांपेक्षा जास्त दिवस रक्त बाटलींत राहिलें तर त्यामध्यें दोष निर्माण होतात; तें वापरलें जात नाहीं. अमेरिकेंतील वेस्टचेस्टर ब्लड सर्व्हिस ह्या फर्मनें बाटल्यावरील तारखा बदलून तें वेगवेगळ्या इस्पितळांना पुरविलें; कांहीं बाटल्यांवरील तारीख ४२ दिवसांनीं पुढें करण्यांत आली होती! अमेरिकन सरकारनें रक्ताची शुद्धता आणि ताजेपणा तपासण्यासाठी इन्स्पेक्टर्स नेमलेले आहेत, तरीसुद्धां हा प्रकार घडला.

### वॉशिंग्टन शहरांतील वर्णद्वेषाचें वातावरण

अमेरिकेंतील कांहीं संस्थानांतून वर्णभेद पाळण्यांत येतो; शाळा, बसेस, हॉटेल्स, इत्यादींमधून निग्रो लोकांना वगळण्याकडे कल दिसून येतो. ही गोष्ट प्रसिद्धच आहे. परंतु हे वर्णभेदाचें व वर्णद्वेषाचें वातावरण वॉशिंग्टनसारख्या शहरांतूनहि आहे असें आढळून आलें आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासद असलेल्या आफ्रिकी देशांचे प्रतिनिधी वॉशिंग्टनला येतात तेव्हां त्यांना राहण्याच्या जागेची अडचण पडते अशा तक्रारी करण्यांत येत आहेत आणि अमेरिकेच्या राजधानींत हा प्रकार चालू देण्यात यावा ह्याबद्दल खेद व आश्चर्य प्रकट करण्यांत येत आहे. ह्या प्रकरणाची सार्वजनिक चौकशी करण्याचें काम सिव्हिल राइटस कमिशन ह्या खाजगी संस्थेनें करण्याचें ठरविलें असून अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याची तिला सहानभूति आहे. वॉशिंग्टनमधील घरमालकांना अधिक जबाबदारीनें वागण्यास शिकवण्यासाठी अशा चौकशीचा उपयोग होईल असा अमेरिकेचा विश्वास आहे. गेल्या ८–१० महिन्यांत अमेरिकन सरकारनें घरमालकांनीं आपलें धोरण बदलावें म्हणून बरीच खटपट केली. पण तिचा फारसा उपयोग झालेला नाहीं. वॉशिंग्टन शहरांतील वायव्य भाग राहाण्याच्या सुखसोयीच्या जागांसाठीं प्रसिद्ध आहे. अशा २११ जागांच्या मालकांपैकीं फक्त ८ जागांच्या मालकांनींच निग्रो भाडेकऱ्यांना जागा देण्याची तयारी दाखविली. हे भाडेकरी अमेरिकन निग्रो असोत अगर आफ्रिकी देशांचे राजनैतिक प्रतिनिधी असोत, त्यांना राहाण्याची जागा देण्यास बाकीच्या मालकांनीं विरोध दाखविला. त्यामुळें खुद्द वॉशिंग्टन शहरांत एक प्रकारचें स्फोटक वातावरण निर्माण झालें आहे. घरमालक अधिक सूज्ञपणें वागले नाहींत तर अधिक कडक उपाय योजण्याची भाषा अमेरिकन सरकारनें काढली आहे. ह्या प्रकरणाची सार्वजनिक चौकशी सरकारला पोषकच ठरण्याचा संभव आहे.

### अन्नसंशोधन संस्थेला अमेरिकेची मदत

म्हैसूर येथील मध्यवर्ती अन्नसंशोधन संस्थेला अमेरिकेकडून ३७ लाख, २० हजार रुपये मदतीदाखल देण्यांत आले आहेत. प्रथिनयुक्त स्वस्त अन्नपदार्थ तयार करण्यासाठी संशोधन करण्याचें कार्य संस्था करीत असते. भारतामधील लोकांच्या आहारांत प्रथिनें कमी प्रमाणांत असतात असें आढळून आल्यावरून ही उणीव भरून काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. संस्थेनें आतांपर्यंत कांहीं महत्त्वाचे संशोधन केले आहे. संस्थेतर्फे तयार करण्यांत आलेल्या अन्नपदार्थांच्या सेवनाचा लोकांवर काय परिणाम होतो ते निरनिराळ्या भागांत पाहाणी करून ठरविण्यांत येणार आहे. अपुऱ्या दिवसांचीं मुलें, १ ते ५ वर्षें वयाचीं मुलें, गर्भवती व लेकुरवाळ्या स्त्रिया, ह्यांना संस्थेनें तयार केलेलें अन्नप्रयोगादाखल मोठ्या प्रमाणावर देण्यांत येणार आहे.

### सिलोनसाठी रशिआचें तेल


सिलोन सरकारच्या मालकीच्या पेट्रोलिअम कॉर्पोरेशननें रशिआकडून २८ लाख टन तेल आयात केलें आहे. हें तेल घेऊन येणारी बोट नुकतीच कोलंबोला पोंचली. डिझेल तेलावर चालणाऱ्या मोटारगाड्यासाठी तें वापरण्यांत येणार आहे. सिलोनला रशियाकडून मिळालेल्या तेलाचा हा दुसरा हप्ता आहे. सिलोनच्या नव्या वर्षाला एप्रिलच्या मध्यापासून प्रारंभ होतो. तेव्हांपासून आयात केलेल्या तेलाचें वितरण कॉर्पोरेशन करणार आहे.

### प्रयोग फसला

अमेरिकेंतील फोर्ड-फौंडेशननें बैलांच्या शक्तीचा उपयोग करून वीज निर्माण करण्याचा प्रयोग दिल्लीपासून १८ मैलांवर असलेल्या एका खेड्यांत सुरू केला होता. ह्या प्रयोगाच्या यशापयशाचें मूल्यमापन करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या कमिटीनें असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं प्रयोगाच्या साह्यानें निर्माण करण्यांत येणारी वीज महाग पडते; शिवाय ही वीज उत्पादनपद्धति भारतामधील परिस्थितीला जुळणारी नाहीं. हा प्रयोग १९५८ सालीं सुरू करण्यांत आला होता. त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री मुद्दाम बनविण्यांत आली होती. खेड्यांना लागणारी वीज पुरविण्याच्या प्रयोगाचा हेतु होता. परंतु यंत्रसामग्रीची किंमत फार असल्याचें आढळून आलें आणि तरीहि उत्पन्न होणारी वीज ३०० घरांच्या खेड्याला रोज सरासरी एक तासच दिव्यासाठी वापरता आली असती.

### क्षयावरचें रामबाण औषध

क्षयरोगाविरुद्ध स्ट्रेप्टोमायसीन या औषधाचा शोध लावणारे डॉ. वॉक्समन ह्यांनीं असें भाकित केलें आहे कीं, येत्या दहा ते बारा वर्षांत अमेरिकेंतून क्षयरोगाचें संपूर्ण उच्चाटन होईल. त्यांनीं दिलेल्या माहितीप्रमाणें वरील औषधाचा उपचार करण्यांत आलेल्या १ लाख रोग्यांपैकीं फक्त ८ च रोगी अमेरिकेंत दगावले. क्षयरोगानें पछाडलेल्या रोग्यांपैकीं फक्त ६ टक्के रोगीच स्ट्रेप्टोमायसिनचा उपयोग करूनहि दगावतात, असा अनुभव इस्राइल राज्यांत आला आहे.

### नेपाळला सिमेंटचा जादा पुरवठा

भारत सरकार नेपाळला करण्यांत येणाऱ्या सिमेंटच्या व लोखंडाच्या पुरवठ्यांत वाढ करणार आहे. चालू वर्षांत नेपाळला ३० हजार टन सिमेंट व ५ हजार टन लोखंड पुरविण्याचा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे. गेल्या वर्षी भारतानें नेपाळला १२ हजार टन सिमेंट व १,२०० टन लोखंड पुरविलें होतें. नेपाळमध्यें विकासाचें कार्य वाढत चाललयामुळें सिमेंटची मागणी वाढत चालली आहे. सिमेंटची टंचाई अंशत: भरून काढण्यासाठी नेपाळनें चीनकडून ५ हजार टन सिमेंटची आयात केलेली आहे.

### हौशी प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी

काश्मीरमध्यें अधिक हौशी प्रवाशांना आकर्षित करून घेण्यासाठी राज्य सरकारनें ३० लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेचा उपयोग प्रवाशांच्या सुखसोयी वाढविण्यासाठी करण्यांत येणार आहे. प्रवाशांना राहाण्यासाठी ठिकठिकाणीं कच्चीं व पक्कीं निवासस्थानें बांधण्यांत येणार आहेत. त्याशिवाय गुलमर्ग व पहलगांव ह्या ठिकाणीं दोन अद्ययावत् पद्धतीचीं होटेल्स बांधण्यांत येणार आहेत. १९६१ सालीं सुमारें ९२ हजार प्रवाशांनीं काश्मीरच्या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेतला.

### राजस्थानमधील भूमिगत पाणीपुरवठा

भारतांत ज्या प्रदेशांत जमिनीवर पाण्याचा पुरवठा नाहीं त्या ठिकाणीं भूमीगत पाण्याचा शोध करण्यासाठी एक संघटना स्थापन करण्यांत आलेली आहे. ही संघटना पाण्याचें दुर्भिक्ष असलेल्या भागांत ट्यूब वेल्स खोदून भूमीगत पाण्याचा शोध लावण्याचें काम करतें. राजस्थानांतील जेसलमीर भागांत ह्या संघटनेला कल्पनेपेक्षाहि अधिक यश मिळालें आहे. ह्या भागांत खोदण्यांत आलेल्या १७ विहिरींपैकीं १२ विहिरींना चांगलें पाणी लागलें आहे. पाण्याचा दर्जाहि चांगला आहे. एका विहिरींतून तर दर तासाला ५१,००० गॅलन पाणी मिळू शकत आहे. इतर विहिरींतूनहि दर तासाला ४० हजार ते १६ हजार गॅलन पाणी मिळत आहे. विहिरी खोदणाऱ्या संघटनेच्या प्रमुखानें केलेल्या अंदाजाप्रमाणें राजस्थानांत १० लाख एकर जमिनीखाली गोड पाण्याचा भूमिगत सांठा असावा. राजस्थानमधील शेतकऱ्यांपुढें पाण्याच्या टंचाईचा प्रश्न नेहमींच उभा असतो. त्यामुळें ते आपलीं गुरेंढोरें घेऊन पाण्याच्या शोधार्थ भटकत असतात. उन्हाळ्यांत ही टंचाई इतकी तीव्र होते कीं, घरीं आलेल्या पाहुण्याला शेतकरी पाणी न देता दूध देतात. भूमिगत पाण्याच्या शोधामुळें त्यांचें जीवन आतां अधिक स्थिर होईल.

### रेल्वेगाडी न पाहिलेले आमदार

मध्य प्रदेशाच्या विधानसभेवर निवडून आलेल्या ७ आमदारांनीं अद्याप रेल्वेगाडी पाहिलेली नाहीं. राज्यांतील बस्तर जिल्ह्यामधून ते निवडून आलेले आहेत. हा जिल्हा दळणवळणाच्या साधनांच्या अभावीं दुर्गम असून त्यांतील बहुसंख्य लोक आदिवासी आहेत. मध्य प्रदेश विधान सभेच्या अधिवेशनासाठी ह्या आमदारांना भोपाळला जावें लागलें. त्यावेळीं त्यांनीं प्रथमच रेल्वेनें प्रवास केला. कायदेमंडळांतील कामकाजाची व ते करण्याच्या पद्धतीची त्यांना मुद्दाम माहिती करून देण्यांत आली. बस्तर जिल्ह्यांतील आदिवासींच्या खेड्यांतून भोपाळमधील विधानसभेपर्यंतचा त्यांचा प्रवास भारतीय लोकशाहीच्या विकासाचा द्योतक म्हणतां येईल.

X·2m, N35


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

**सरदारगृह**

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००



★ सुवर्ण-महोत्सवी वर्ष ★

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई**

(दि विदर्भ सहकारी बँक लिमिटेड सम्मीलित)

मुख्य कचेरी— ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई टेलिफोन नं. २५५४७४-७५

विभागीय कचेरी— महाल-नागपूर तारेचा पत्ता— फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रुझ

: नागपूर विभागांतर्गत शाखा :

(१) सिताबर्डी (२) अमरावती (३) चांदा (४) मलकापूर (५) खामगांव ६ बुलढाणा

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. ३ कोटी, ६० लाख |
| गंगाजळी व फंड | रु. १ कोटी, ४ लाख |
| ठेवी | रु. १९ कोटी, १० लाख |
| खेळतें भांडवल | रु. ५४ कोटी, ८६ लाख |

*महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.*

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

### यांत्रिक हत्यारांचे आणखी कारखाने

मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं लोकसभेंत अशी माहिती सांगितली कीं, पंजाब व आंध्र राज्यांत आणखी दोन यांत्रिक हत्यारांचे कारखाने उभारण्यांत येणार आहेत. ह्या कारखान्यांच्या उभारणीच्या कामांत पूर्व जर्मनी व पोलंड ह्या देशांकडून साह्य घेण्यांत येणार आहे. ह्याशिवाय भारतामधील एका बंदराजवळ यांत्रिक हत्यारांचा तिसरा कारखाना काढण्याचा विचार सरकारतर्फे चालू आहे. यांत्रिक हत्यारांची निर्यात भारताला करता यावी म्हणून हा उपक्रम हातीं घेण्यांत येत आहे. त्या दृष्टीनें कारखान्याची उभारणी करतांना विशेष लक्ष देण्यांत येणार आहे. यांत्रिक हत्यारांचे नवीन नमुने तयार करण्यासाठी कांहीं केंद्रें उभारण्याचाहि सरकारचा विचार आहे. हिंदुस्थान मशीन टूल कारखान्यानें १९५९–६० सालीं चांगली प्रगति केली आहे, असेंहि त्यांनीं सांगितलें.

### नवीन गॅस कंपनीची स्थापना

आसाम राज्यांत नैसर्गिक वायूचा घरगुती उपयोगासाठी व औद्योगिक उपयोगासाठी वापर करण्याच्या हेतूनें एका कंपनीची स्थापना करण्यांत येणार आहे. कंपनीचें नांव आसाम गॅस कंपनी लि. असें असून ती खाजगी मालकीची राहील. कंपनीचें भांडवल २ कोटी रुपयांचें असेल व तें प्रत्येकी १०० रुपयांच्या २ लाख भागांत विभागले जाईल.

### लोकसभेंतील न बोलणारे खासदार

३१ मार्च, १९६२ ला मुदत संपलेल्या दुसऱ्या लोकसभेंत एकूण सभासदांची संख्या ५०७ होती. ह्या सभासदांपैकीं १०४ सभासदांनीं आपल्या पांच वर्षांच्या सभासदत्वाच्या कालांत लोकसभेंत एकदाहि तोंड उघडलें नाहीं! तीन सभासद ५ वर्षांच्या अवधींत अवघे ५ मिनिटें बोलले. आणखी तीन सभासदांनीं वरील कालांत अवघें २ ते ४ मिनिटें भाषण केलें. पं. ठाकुरदास भार्गव ह्यांनीं लोकसभेच्या कामांत सर्वांत अधिक भाग घेतला. त्यांनीं २२३ प्रसंगीं भाषणें केली. ह्या सर्व भाषणांचा काळ ५८ तास व ४५ मिनिटें एवढा होतो. त्यांच्या खालोखाल पं. नेहरूंचा क्रम लागतो. पं. नेहरू लोकसभेंत १०० वेळां बोलले व सर्व वेळां मिळून त्यांनीं ५६ तास, २६ मिनिटें भाषण केलें. त्यांच्या खालीं गृहखात्याचे श्री. बी. एन्. दातार ह्यांचा क्रम लागतो.

### कोळशाच्या खाणीबाबत पोलंडचें साह्य

भारतामधील कोळशाचें उत्पादन वाढविण्याच्या कामीं पोलंडचें साह्य मिळण्याची शक्यता आहे. ह्यासंबंधीं उभयता देशांत योग्य तो करार करण्याच्या वाटाघाटी चालू आहेत. नॅशनल कोल डेव्हलपमेंट बोर्ड व पोलंडचें सरकार ह्यांच्या दरम्यान हा करार करण्यांत येईल. पोलंडच्या भारतामधील वकिलांनीं बिहार व पश्चिम बंगालमधील कोळशाच्या खाणी-विभागाचा दौरा केल्यावर वरील माहिती जाहीर केली. ते आणखी म्हणाले कीं, भारतामधील पोलादाचा धंदा आतां वाढीला लागला आहे. ह्या धंद्याकडून कोळशाची मागणी वाढत्या प्रमाणावर होणें अपरिहार्य आहे. त्यामुळें कोळशाच्या उत्पादनाची वाढ करण्याचे प्रयत्न आतांपासूनच करण्यांत आले पाहिजेत. नाहींतर कोळशाच्या टंचाईमुळें पोलादाच्या उत्पादनावर अनिष्ट परिणाम होईल.


टेलिफोन नं. २४८३.

## पुणें सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या.........**

**आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.**

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४। टक्के |
| ३ वर्षें | ... | ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... | ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.



## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–२ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४ टक्के, २ वर्षें–४·२५ टक्के, ३ वर्षें–४·५० टक्के, ४ वर्षें–४·७५ टक्के, ५ वर्षें–५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा विस्तार

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५,६६,००० |
| ठेवी | रु. | ३,०१,६९,०३० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,५१,८७,००० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी. चेअरमन.

## भारतीय बँकांत सहकारी वृत्तीची उणीव
### बँकांच्या नव्या वर्गवारीची आवश्यकता

**( श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचें** महाराष्ट्र बँकेच्या वार्षिक सभेंत अध्यक्षीय भाषण )

**लहान व स्वावलंबी राहूं न शकणाऱ्या बँकांचें मोठ्या बँकांमध्यें विलीनीकरण करण्याच्या रिझर्व्ह बँकेनें ठरविलेल्या धोरणास** अनुसरून महाराष्ट्र राज्यांत व्यवहार करीत असलेल्या बँक ऑफ नागपूर लि., बँक ऑफ कोंकण लि. व भारत इंडस्ट्रिअल बँक लि. या तीन बँका या वर्षी आपल्या बँकेंत रिझर्व्ह बँक योजनेनुसार समाविष्ट झाल्या. या तिन्ही बँकांचे ठेवीदारांना सरकारनें संमत केलेल्या योजनेप्रमाणें आम्हीं १०० टक्के रकम परत केली हें सांगण्यास मला आनंद होत आहे. यंदा आपल्या बँकेनें तीन नवीन शाखा सुरू केल्यामुळें उपरिनिर्दिष्ट बँकांच्या आपण घेतलेल्या शाखांसह आतां आपल्या ७९ शाखा झाल्या आहेत. त्याचप्रमाणें गोव्याचें भारताशीं पुनर्मीलन झाल्यानंतर त्या भागांतहि आपल्या बँकेच्या २ शाखा काढण्याचें संचालकांनीं ठरवलें असून त्याबाबतचा अर्ज रिझर्व्ह बँकेकडे करण्यांत आला आहे.

पुरामुळें पुण्याच्या उद्योगधंद्यांचें व व्यापारीवर्गाचें तसेंच सर्वसामान्य जनतेचेंहि बरेंच नुकसान झालें. संचालकांनीं ही आपत्ति आल्यानंतर एका आठवड्याचे आंतच पूरग्रस्त, व्यापारी, कारखानदार वगैरेंना, ते बँकेचे खातेदार आहेत कां नाहींत हा भेदभाव न करतां आर्थिक मदतीची योजना जाहीर केली. सुमारें ८६० लोकांनीं रु. २८॥ लाख इतकी कर्जाऊ रकम घेऊन त्या योजनेचा फायदा घेतला. मुख्य मंत्र्यांच्या पूरनिवारणनिधीसहि रु. ५,००० ची देणगी बँकेनें दिली आहे. हीं कर्जें मंजूर केल्याबद्दल व्यापारी व सर्वसामान्य जनता यांनीं बँकेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. तसेंच सरकारी गोटांतहि आपल्या कार्याबद्दल कौतुकोद्गार काढले गेले आहेत, हें सांगण्यास मला अभिमान वाटतो. संस्थेच्या स्टाफनें दाखविलेल्या प्रसंगावधानाबद्दल संचालक मंडळानें त्यांस पारितोषिकें देऊन त्याची दखल घेतली आहे.

१९६१ मध्यें भारतीय बँकिंगची समाधानकारक प्रगति झाली. राष्ट्रीय नियोजनाच्या काळांत राष्ट्राचीं विकास कार्यें व औद्योगीकरण जर द्रुतगतीनें व्हावयाचीं असतील तर सर्वांचे सहकार्याची अत्यंत आवश्यकता आहे. पण नेमकी याचीच उणीव, भारतीय बँकांमध्यें दिसून येत आहे, हें सांगण्यास मला खेद होत आहे. बँकांमध्यें एकमेकांत अनिष्ट स्पर्धा करण्याचेंच धोरण दिसून येत आहे. माझ्या मागील वर्षीच्या भाषणांत मी याचा उल्लेख करतांना असें सुचविलें होतें कीं, बँकांनीं आपल्यापुरतीच कुठलीहि कृति न करतां त्याचा अन्य लहान व नवीन बँकांवर काय परिणाम होईल याचा विचार केला पाहिजे व त्यांचें कार्य अशा लहान बँकांना मदत करणें हेंच असावयास पाहिजे. मोठ्या बँका याबाबत स्वतःच्या बँकेच्या वाढीपुरताच विचार करतात असें दिसतें. त्यांचेपुढें देशाची आर्थिक गरज व एकंदर बँकिंग धंद्याची उन्नति याची जाणीव असलेली दिसत नाहीं. राष्ट्रीय पातळीवर बँकिंग धंद्याचे वाढीसंबंधीं निश्चित धोरणाचा अभाव हें याचें कारण असावें असें माझें मत आहे. भारत सरकार किंवा रिझर्व्ह बँक यांपैकी कोणीहि निःसंदिग्ध शब्दांत याबाबत आपलें धोरण जाहीर केलेलें नाहीं. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या तीन मोठमोठ्या योजनांतहि अशा तऱ्हेचें दिग्दर्शन बँकांना झालेलें दिसत नाहीं.

या देशांत लहान बँका असाव्यात कीं कांहीं मोठ्या बँकांचे अधिकारी सध्यां प्रतिपादन करीत आहेत त्याप्रमाणें, कांहीं थोड्या व मोठ्याच बँका असाव्यात याबाबत निश्चित धोरण आंखण्याची आतां वेळ आली आहे. 'लहान' व 'मोठी' हे शब्द सापेक्ष आहेत. त्यामुळें बँकांचे बाबतींत त्याचा स्पष्ट अर्थ करणें जरूर आहे. याबाबतच्या व्याख्येच्या अभावीं सध्यां आणखी एक मध्यम आकाराच्या बँकांचा तिसरा वर्ग निर्माण करण्याची मागणी जोरानें पुढें येत आहे. केवळ ठेवी व खेळत्या भांडवलाचे आकारावरून बँकांची वर्गवारी ठरविली जावी हें माझें मतें अयोग्य आहे. माझे मतें यापुढें बँकांचें कार्यक्षेत्र व दर्जा यांनुसारच त्यांची वर्गवारी करण्यांत यावी. त्याप्रमाणें सध्यांच्या बँकांची स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशी वर्गवारी करणें कठीण होणार नाहीं. ही कल्पना आपल्यापुढें ठेवतांना रिझर्व्ह बँक व मध्यवर्ती सरकारनें याबाबत निश्चित धोरण जाहीर करणें किती जरूर आहे, हें दिसून येईल. या वर्षी बँकांचे ठेवीची विमा–योजना कार्यवाहींत आली असल्याकारणानें व रिझर्व्ह बँकेची तपासणी आतां वारंवार होत असल्यानें यापुढें लहान बँकांचे स्थैर्याबद्दल साशंकता बाळगणें योग्य ठरणार नाहीं. त्यामुळें यापुढें लहान–मोठ्या सर्व बँकांनीं व्याजाचे दर सारखे ठेवून एकमेकांतील स्पर्धा टाळणें उचित ठरेल.

---

### नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदनगर

नव्या मार्केट यार्डमध्यें बँकेचें गोडाऊन बांधण्यांत यावयाचें आहे. त्याचें भूमिपूजन चैत्र शुद्ध प्रतिपदा गुरुवार दि. ५-४-१९६२ रोजीं सायंकाळीं ५–३० वा. माननीय नामदार श्री. बी. जे. खताळ, सहकार उपमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्तें होणार आहे.

---

### परदेशीय कंपन्यांतून पाकिस्तान्यांना नोकऱ्या

पाकिस्तानांत परदेशीय कंपन्यांची संख्या वाढत चाललेली आहे. ह्या कंपन्यांतून काम करणाऱ्या नोकरांच्या संख्येंत पाकिस्तानी नागरिकांची भरती अधिक प्रमाणांत व्हावी म्हणून पाकिस्तान सरकारनें एक योजना तयार केली आहे. ह्या कंपन्यांतून असलेल्या नोकरीच्या जागांपैकी ज्या जागांचे पगार १,००० रुपयांच्या आंत असतील त्या जागावर ह्यापुढें फक्त पाकिस्तानी नागरिकांचीच नेमणूक करण्यांत यावयाची आहे. १ हजार ते २॥ हजार रुपये दरमहा पगार असणाऱ्या जागांपैकी ७५ टक्के जागा पाकिस्तान्यांना देण्यांत यावयाच्या आहेत. दरमहा २॥ हजारांपेक्षा अधिक पगार असणाऱ्या जागांपैकी ५० टक्के जागांवर पाकिस्तानी नागरिकांची नेमणूक करण्यांत यावयाची आहे.

---

### आसामचा पाकिस्तानशीं व्यापार

१९६१ सालीं आसाम राज्यानें करीमगंज सरहद्दीवरून पूर्वपाकिस्तानामधून ६४ लाख रुपये किंमतीच्या माशांची आयात केली. १९६० सालीं ४५ लाख रुपये किंमतीचे मासे आयात करण्यांत आले होते. १९६१ सालीं आसाम राज्यानें लांकूड, संत्रीं, अननस, ऊंस, इत्यादि पदार्थ पूर्वपाकिस्तानला निर्यात करून १४ लाख रुपये मिळविले. त्यामागील वर्षी निर्यात मालाच्या किंमतीच्या मापानें ९ लाख रुपये मिळविण्यांत आले होते.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.